# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १३६५८/ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २९ जून, २०२२

**:: परिपत्रक ::**

विषय: **महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांनी विधान भवन, मुंबई येथे प्रवेश मिळण्यासाठी कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने पाळावयाच्या सूचनांबाबत ...**

महाराष्ट्र विधानसभेचे **विशेष अधिवेशन गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२** रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) विशेष अधिवेशन कालावधीत विधान भवनात **मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव व एक स्वीय सहायक** यांस प्रवेश देण्यात येणार असल्याने त्याप्रमाणे **'खाजगी सचिव'** यांच्या स्वाक्षरीने उपस्थित राहणाऱ्यांची नावे या सचिवालयास कळवावीत व त्याप्रमाणे प्रवेशपास प्राप्त करून घ्यावेत.

(२) शासकीय मुख्य प्रतोद / प्रतोद यांचे एका स्वीय सहायकास प्रवेश पास देण्यात येईल.

(३) विधानसभा विशेष अधिवेशन सन २०२२ करिता संसदीय कार्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग व वित्त व नियोजन विभाग, विधी व न्याय विभाग या विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी केवळ आवश्यक असतील तेवढेच अधिकारी व कर्मचारी यांची नावे त्यांच्या विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(४) विशेष अधिवेशनाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रवेशपत्रिकेवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिका धारण करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

(५) विशेष अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

.. २/-

(६) मा.मंत्री/राज्यमंत्री आस्थापना तसेच, संबंधित मंत्रालयीन विभागाने दिलेले ओळखपत्र व विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येईल.

(७) **कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

वरील सुरक्षाविषयक तसेच, कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात आलेल्या सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(राजेश तारवी)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीस्तव:**

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

**प्रति :**

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तसेच मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

**याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

(१) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
(२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.